॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

(पदवीप्रदान समारंभ-2023- भोजन समिती)

जावक क्रमांक:- कबचौउमवि/7-अ/भोजन समिती/दरपत्रक/650/2023 दिनांक :- 06.02.2023

दरपत्रक सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा 31 वा पदवीप्रदान समारंभ 2023 (दीक्षांत समारंभ) दि.17.02.2023 रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. त्यासाठी चहा, अल्पोपहार (नाश्त्याच्या) व्यवस्थेसाठी खालील तपशीलात दर्शविलेल्या मेनुप्रमाणे प्रति प्लेट संख्येनुसार सेवा पुरविणाऱ्या पंजीकृत पुरवठादारांकडून सिलबंदरित्या दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	साहित्याचा तपशील	प्लेट नग- संख्या (अंदाजे)	दर प्रति प्लेट सर्व करांसह	एकूण रक्कम सर्व करांसह
1	अल्पोपहार (नाश्ता) उपमा-200 ग्रॅम व चहा (मिनरल वॉटरसह)	400		
2	विद्यार्थ्यांकरिता फुड पॅकेट कचोरी- 2 नग (खटाईसह) खोबरा बर्फी-2 नग	1000		

दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची माहिती खालीलप्रमाणे. :-

1. सदर दरपत्रक सुचनेनुसार सहभाग घेण्यासाठी अधिकृत नोंदणी असलेल्या पुरवठादाराची दरपत्रके स्विकारली जातील. त्यासाठी दरपत्रका सोबत शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशनची/संस्थेची नोंदणी दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
2. पुरवठादाराने अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवान्याची प्रत जोडणी आवश्यक आहे.
3. पुरवठादाराने PAN CARDची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
4. पुरवठादाराने GST प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे. (आवश्यक असल्यास)
5. दरपत्रकात नमुद करावयाचे दर हे सर्व करांसह (GST सह) नमुद करण्यात यावेत. त्यासाठी स्वतंत्रपणे सिलबंद पाकीटात लेटरहेडवर सही, शिक्क्यानिशी दर नमुद करून सादर करावेत.
6. सशर्थ दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
7. सदरचे अल्पोपहार व फुड पॅकेटस् वाटप करावयाची व्यवस्था ही वेगवेगळ्या 2-3 ठिकाणी करावयाची असून त्यासाठी भोजन समिती सांगेल त्या ठिकाणी करणे पुरवठादारास आवश्यक राहिल.
8. सदरची व्यवस्था व साहित्य व स्वखर्चाने विद्यापीठाच्या परिसरात करावी लागेल.
9. कार्यक्रमाच्या स्थळी विद्यापीठ परिसरातील कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित पुरवठादाराकडून वसुली करण्यात येईल.
10. कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता राखणे राखणे व करून देणे आवश्यक राहिल.
11. कार्यक्रमात शिल्लक राहिले खरकटे, इतर अनावश्यक पदार्थाची विद्यापीठ वसतीगृहातील जैविक कचरा मशीन्स मध्ये विल्हेवाट लावणे पुरवठादारा बंधनकारक राहिल.
12. स्वयंपाकासाठी लागणारी भांडी, इतर साहित्य , वाढपी, नोकरवर्ग यांची व्यवस्था पुरवठादाराने स्वत: करावी लागेल.
13. चहा,नाश्ता व फुड पॅकेट तयार करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे आवश्यक राहिल.
14. उपरोक्त कामी बाल कामगार नेमण्यात येऊ नयेत.
15. कार्यक्रमासाठी वापरण्यातयेणाऱ्या गॅस यंत्रणेची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहिल. स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संपुर्ण नुकसानीची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.

16. पुरवठादारास उपरोक्त कार्यक्रमासाठी कोणतीही अग्रीम रक्कम दिली जाणार नाही. काम पुर्ण झाल्यानंतर पुरवठादारास TDSरक्क्म कपात करून देयकाची अदायगी करण्यात येईल.
17. स्वयंपाकासाठी लागणारे मंडप, पाणी, वीज व अन्न वाटपासाठी लागणारे स्टॉल इ.व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल. मात्र स्वयंपाकासाठी लागणारे संपुर्ण साहित्य भांडे, प्लेट, वाटी, चमचे, टिश्यु पेपर, ग्लास , डस्टबीन व तत्सम साहित्य आदीची व्यवस्था पुरवठादारास करणे आवश्यक राहिल.
18. देयक सादर करताना विद्यापीठाचा GST no 27AAAJN0465A1ZL चा उल्लेख करून पक्के बील द्यावे लागेल. बीलातील GSTची रक्कम शासनाकडे भरणा केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहिल. तद्नंतरच भोजन समितीचे अध्यक्षांनी शिफारस केल्यानंतर देयकाची अदायगी 15 दिवसानंतर करण्यात येईल.
19. पुरवठादाराने चहा,नाश्ता (अल्पोपहार) करिता सर्व वस्तु उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात. त्यासाठी शुध्द सोयाबीन तेल वापरण्यात यावे.
20. चहा, नाश्ता (अल्पोपहार) करिता वापरण्यात येणारे दुध, अन्नधान्य- किराणा माल, भाजीपाला तसेच तयार केलेले अन्नपदार्थ यांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मालाचा दर्जा तपासण्यात येईल. भोजन पदार्थ तपासणीचा खर्च हा नियमानुसार पुरवठादार यांनी करणे बंधनकारक राहिल. भोजन पदार्थांच्या दर्जाबाबत तपासणीअंती तथ्य आढळून आल्यास संबंधितावर प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल व पुरवठा आदेश तात्काळ रद्द करून काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.
21. विद्यापीठ हित लक्षात घेऊन, सदरच्या दरपत्रक सुचनेतील एखादी अट शिथील करण्याचा व अर्थ लावण्याचा तसेच पुर्णत: अथवा अंशत: मंजुर करण्याचा तसेच कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक स्विकारण्याचा, फेटाळण्याचा, वरील सर्व अटींमध्ये संपुर्णत: किंवा अंशत: बदल करण्याचा वा नाकारण्याचा तथा वाटाघाटीअंती योग्य पुरवठादारास कार्यादेश देण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.
22. सिलबंद पाकीटावर' दीक्षांत समारंभ-2023 करिता अल्पोपहार व फुड पॅकेट्स पुरिवण्याचे दरपत्रक' असा स्पष्ट उल्लेख असावा.
23. अंतीम वाटाघाटीसाठी पुरवठादारास विद्यापीठात समितीशी चर्चा करण्यासाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
24. सदरची सिलबंद दरपत्रके अध्यक्ष भोजन समिती, गणितशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि,जळगाव यांच्याकडे दि.10.02.2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करण्यात यावेत.

06/02/2023

(डॉ.एस.आर.चौधरी)
अध्यक्ष भोजन समिती,
31वा पदवीप्रदान समारंभ-2023
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रति,